Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# इतिहास लेखन प्रक्रियेच्या मुळाशी उपयुक्ततावादी विचारसरणी

**निळे सुधाकर विष्णू**

पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर. ता. राहाता,जि.अहमदनगर.

**सारांश :**

इ.स.पुर्व ५ व्या शतकामध्ये ग्रिस मध्ये इतिहास लेखनाची प्रक्रिया सुरु झाली. पुढे तिचा विविध राष्ट्रात प्रसार होवून इतिहास लेखन विकसीत होत गेले. ज्या काळात इतिहास लिहला गेला त्या काळातील रुढ विचार मुल्य इतिहासात सामाविष्ट झाली. कोणतेही लेखन हे समाजाच्या उपयोगासाठीच असते. जर एखाद्या लेखनाचा समाजाला उपयोग होत नसेल तर त्या लेखनाची व त्यातील माहितीची किंमत शुन्य ठरत असते. काळाच्या ओघात असे लेखन लुप्त होते. इतिहासाची सुरवात इ.स. पुर्व ५ व्या शतकात झाली आणि आजही इतिहास लेखनाची प्रक्रिया निरंतर सुरु आहे. यावरुन निश्चितच इतिहासाचा समाजाला उपयोग होत असला पाहिजे. इतिहासात भूतकाळ घडुन गेलेल्या घटनांची माहिती असते. या घटनांचे विश्लेषण करुन अन्वयार्थ लावला जात असतो. परंतु घटनांचा अन्वयार्थ लावतांना, संशोधक ज्या गटाचा, पक्षाचा, राष्ट्राचा किंवा एखाद्या विचारसरणीचा आहे. त्या बाजुने आपल्या पक्षाला, गटाला, राष्ट्राला किंवा विचारसरणीला उपयुक्त व पुरक ठरेल असा अन्वयार्थ लावत असतो. इतिहास हे एक शस्त्र आहे समाजाची मानसीक जडण घडण करण्याचे काम इतिहास करत असतो. व्यक्ती जेव्हा इतिहास वाचते किंवा शिकते तेव्हा त्या समाजाची मानसीक जडण घडण करण्याचे काम इतिहास करत असतो. त्यावेळी मिळालेल्या माहितीच्या आधारी व्यक्ती आपली विचारसरणी बनवित असते.

इतिहास लेखन करतांना संशोधक आपल्या संशोधनाचा उपयोग समाजाला किती होईल यापेक्षा आपल्या गटाला, राष्ट्राला, पक्षाला अथवा विचारसरणीला कितपत होईल हेच बघत असतो. आधुनिक काळात रँकेच्या मतप्रवानुसार वस्तुनिष्ठ पध्दतीने लेखन करुनही अप्रत्यक्षरित्या उपयुक्तावादी दृष्टीकोन ठेवला जात असतो. आपले लेखन कसे शास्त्रशुध्द आहे यासाठी पध्दतीशास्त्राचा वापर केला जातो. यामुळे इतिहास लेखनात नवनविन प्रवाह निर्माण झाले आहेत आणि होत आहे. परंतु या सर्व लेखनाच्या मुळाशी उपयुक्तवादी विचारसरणी दडलेली असते. इतिहास लेखनाचा हेतू इतिहासाची उपयुक्तता दर्शवित असतो.

**शोधक शब्द (Key Words): History & usury इतिहास लेखन व उपयुक्तता संबंध, उपयुक्तातावाद** **संशोधनाचे उद्दीष्टे :-**

१. सर्व इतिहास लेखनाच्या मुळाशी उपयुक्तावादाची विचारसरणी आहे हे स्पष्ट करणे.
२. इतिहास संशोधक ज्या विचाराचा प्रतिनीधी आहे त्याच विचाराचा प्रवर्तक असतो.
३. इतिहास हे सांस्कृतीक व मानसीक वर्चस्व गाजविण्याचे साधन असल्याने अजाणतेपणे लोक त्याला बळी पडत व मानसीक व सांस्कृतीक गुलामगिरीचे ओझे वाहतात.

४. हेगेलच्या द्वंदविकासवादा प्रमाणे एक विचारसरणी निर्माण झाली कि त्याला विरोध करणारी दुसरी विचारसरणी निर्माण होते. यातून क्रांती-प्रतीक्रांतीचे लेखन प्रवाह निर्माण होतात.

**पध्दतीशास्त्र :-**

सदर शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. यासाठी इतिहास लेखनशास्त्र विषयक ग्रंथ व इतर इतिहास ग्रंथ यांचे संदर्भ साधन म्हणून अध्ययन करुन अन्वयार्थ लावूण निष्कर्ष सादर केलेला आहे.

**प्रास्तविक :-**

इतिहास लेखन प्रक्रियेची सुरुवात ग्रीस मध्ये झाली व युरोपातील अनेक राष्ट्रात त्याचा प्रसार होवुन ही प्रक्रिया अधीक विकसीत होत गेली. इतिहास लेखनाच्या माध्यमातुन विविध विचारांचा प्रसार करण्यास सुरुवात झाली. युरोपातील प्राचीन काळामध्ये धर्माचे प्राबल्य होते. त्यावेळी इतिहासात ईश्वर, धर्म व नैतीक विचार होते. मध्ययुगामध्ये राजा, सरंजामदार, धर्मगुरु या वर्गाचे वर्चस्व होते. त्यामुळे राजा, राणी, राजपुत्र, धर्मगुरु, सरदार, युध्द, लढाया, तह, करार यांचा इतिहास लिहीला गेला. औद्योगीक क्रांतीनंतर युरोपात भांडवलदार कामगार वर्ग निर्माण झाले. राजेशाही नष्ट होवुन लोकशाही व्यवस्था निर्माण झाली. या काळात शासनावर भांडवलदार वर्गाचा प्रभाव असल्याने भांडवलशाही निमाण झाली. भांडवलदाराला पुरक अशी धोरणे राबविली गेली. यातुन व्यापारवाद साम्राज्यवाद निर्माण झाला. यावेळी वसाहतवादी धोरण स्विकारुन युरापोतील राष्ट्रांनी आशिया आफ्रीकेतील राष्ट्रांवर वर्चस्व निर्माण केले व त्या राष्ट्रांना आपली वसाहत बनविले. परंतु ज्यांच्यावर वर्चस्व गाजवितो त्या भिन्न भाषीक व भिन्न संस्कृतीच्या लोकांबद्दल आपल्याला ज्ञान असले पाहिजे, म्हणून त्यांच्या इतिहासाचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला. यातून वसाहतीचा इतिहास लिहला गेला. पुढे भिन्न विचारामुळे अनेक प्रवाह निर्माण झाले. परंतु अशा सर्व प्रवाहाच्या मुळाशी उपयुक्ततेचा हेतू आढळतो. प्रत्येक प्रवाहाच्या मुळाशी त्याची उपयुक्ततेचा हेतू आढळतो. प्रत्येक प्रवाहाच्या मुळाशी त्याची उपयुक्तता असते त्याला सविस्तर आढावा पढील प्रमाणे.

**विश्लेषण :-**

भारतात ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर ज्या लोकांवर आपण राज्य करतो, त्याचा इतिहास जाणून झेणे गरजेचे आहे. त्यांची संकृस्ती, भाषा, आचार-विचार यांचे ज्ञान असल्याशिवाय आपण त्यांच्यावर यशस्वीपणे राज्य करु शकरणार नाही. म्हणुन सुरवातीस कंपनीच्या अधिकारी वर्गाने संशोधन सुरु केले. १७७० पासुन हा अधिकारी वर्ग इतिहास संशोधनात सक्रीय झाला. संस्कृत व फारशी भाषेचा अभ्यास करण्यासाठी १७८१ मध्ये कलकत्याला वॉरन हेस्टीग्जने मदरसा स्थापन केली. जोनाथन उकंन याने बनारस येथे १७९१ ला संस्कृत पाठशाला स्थापन केली. चार्लर्स विल्कीन्स याने गितेचा इंग्रजीत अनुवाद केला. सर विलीयम जोन्स यांनी कालीदासाचे शाकुंतल जयदेवाचे गितगोविंद या काव्यांचा व मनुस्मृती या ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद केला. हेन्री कोलब्रुक याने बौध्द व जैन धर्माचा अभ्यास करुन त्यावर स्वतंत्र लेख लिहून एशियाटीक सोसायटी च्या नियत कालीकातून प्रसीध्द केले. लिलावती, बिजगणीत, हिंदू तत्वज्ञान या विषयावर मौलीक ग्रंथ लिहीले.

होरेस विल्सन याने मेघदूत ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद केला, कल्हणाचा राजतरंगीनिवर भाष्य केले. व विष्णु पुराणावर संशोधन केले तसेच इंग्रजी-संस्कृत शब्द कोष तयार केला. अशा प्रकारे भारतीय इतिहास विषयक साधन सामग्रीचा शोध घेवुन त्याचा अभ्यास केला. या सर्वांपाठीमागे या अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन असा होता कि ज्या भारतीयांवर आपण राज्य करतो त्यांच्या बद्दल आपल्याला ज्ञान असले पाहिजे. भारतीय संस्कृती उच्च दर्जाची आहे हे त्यांनी जगाला सांगितले. त्यांनी पौरात्य विद्येचा अभ्यास केला म्हणून त्यांना पौरात्यवादी असे म्हटले जाते. पुढे यामध्ये काही भारतीय इतिहासकारही सामील झाले.[१]

संपुर्ण भारत ब्रिटीश सत्येच्या वर्चस्वाखाली आल्यानंतर प्रशासनात काम करण्यासाठी स्वस्त कारकून वर्ग मिळावा या उद्देशाने ब्रिटीशांनी इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केली, त्यामुळे अनेक भारतीय तरुण पाश्चात्य शिक्षण घेवू लागले. याच वेळी इंग्रजांनी एवढ्या मोठ्या भुखंडावर राज्य कसे करावे? कोणती धोरणे भूमीका घ्यावी? अशा अनेक प्रश्नावर इंग्लंड मधील वर्तुळात चर्चा सुरु झाली. या सर्वांनाच भारतात सत्ता टिकवायची होती. यासाठी पौरात्यवादी, लोक वेगवेगळे विचार मांडु लागले. भारतीयांना पाश्चात्य शिक्षण दिले तर ते जागृत होतील व इंग्रजांना या देशावर अधीककाळ राज्य करता येणार नाही असे मानणारा एक गट होता तर दुसरा भारतीयांना पाश्चात्य शिक्षण दिले तर ते राजनिष्ठ होतील खिश्चन धर्मात येतील व या देशावर अधीक काळ राज्य करता येईल असे मानणारा आग्लभाषानिष्ठ गट होता. शेवटी पाश्चात्य शिक्षण द्यावयाचे निश्चित झाल्यावर पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात झाली. परंतु हे शिक्षण देत असतांना शिक्षणातून भारतीय सुशिक्षीत पिढीवर इंग्रजांच्या राज्यामुळेच भारतीय समाजाची प्रगती होते आहे हे बिंबवण्याचा प्रयत्न सुरु झाला. भारतीय तरुणांनी पाश्चात्य देशातील इतिहास सामाजिक संस्था व शास्त्रीय ज्ञान यांचे शिक्षण घेतले. हे सुरु असतांनाच इंग्रज अधिकारी वर्गाने भारताचा इतिहास जेथे भावनेतून लिहीला व भारतीय समाजातील दोष दाखविले. खिश्चन मिशनऱ्यांनी हिंदु धर्मावर टिका केली, त्यातील दोष उघड केले. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी साम्राज्यवाद टिकुन राहावा म्हणून हिंदी जनतेची मानसीक जडणघडण करण्यासाठी दोषयुक्त इतिहासाचे लेखन केले. यामध्ये भारतीयांचा इतिहास नसुन कंपनी सरकारची धोरणे होती. उदा. जेम्स मिलने History of British India हा ग्रंथ लिहीला त्याने तो ग्रंथ तीन भागात हिंदु, मुस्लीम व ब्रिटीश असा लिहला, त्याचे ६ खंड लिहले. ग्रँड डफ ने History of Marathas जे टी व्हिलर याने History of India From Earliest Times व्हिसेंट स्मीथ यानं १५ ग्रंथ लिहले. अशा अनेक इतिहासकारांनी ग्रंथ लिहुन भारतीय लोकांत पराभूत मनोवृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.[२]

साम्राज्यवादी इतिहास लेखनाच्या मुळाशी आपल्याला उपयुक्ततावादी विचारसरणी असल्याचे दिसून येते. इंग्लंडमध्ये जेरेमी बेंथम याने उपयुक्ततावाद मांडला त्याने Defence of Usury हा ग्रंथा लिहला. त्यातुन जास्तीत जास्त लोकांचे कल्याण साधने, याचा अर्थ उरलेल्या लोकांवर अन्याय करणे असे नाही. शासनाने आपली ध्येय धोरणे ठरवितांना हे तत्व समोर ठेवून धोरणे आखावीत असे प्रतीपादन केले. या विचाराचा प्रसार जॉन स्टुअर्ट मिल याने केला तो ईस्ट इंडीया कंपनीत उच्च पदावर नोकरीत होता. भारतात शासकीय धोरणे आखताना इंग्लंड मधील जास्तीत जास्त लोकांचा विकास घडवुन आणणे हे ध्येय होते. कंपनीच्या अधिकारी वर्गाने केलेल्या लिखाणात ही त्याचा प्रभाव पडलेला दिसतो. भारतावर अधिक काळ राज्य करता यावे हि उपयुक्तता इतिहास लेखन करतांना ठेवली गेली. त्यामुळे इंग्रजी राज्यात राहण्यातच भारतीयांचे कल्याण आहे हे इतिहासातून अप्रत्यक्षरित्या बिंबविण्यात आले.[३]

भारतीयांनी पाश्चात्य देशाचा इतिहास अभ्यासला त्याना राष्ट्रवाद, लोकशाही, समता, स्वातंत्र या विचारांची ओळख झाली. ब्रिटीशांच्या इतिहासात कंपनी सरकारची ध्येय धोरणे आहे, त्यात खरा इतिहास नाही हे राजाराम मोहन रॉय यांनी सर्वप्रथम सांगितले. त्यांनी त्यावर लेखनही केले. यानंतर भारतीय विद्वान पध्दतशीरपणे आपल्या इतिहासाच्या साधनांचा शोध घेवु लागले व ब्रिटीशांनी केलेले आरोप, दोषयुक्त लिखाण खोडुन काढू लागले. भारतीयांनी केलेल्या लिखाणातून भारतीयांना जागृत करुन स्वातंत्र मिळविण्यास सज्ज करावे यासाठी विर पुरुषांच्या इतिहासाचे गौरवीकरण व उदात्तीकरण सुरु झाले.[४] असे करण्यापाठीमागे भारतीयांच्या उपयुक्ततावादी दृष्टीकोन आहे. राष्ट्रीय भावना जनतेत निर्माण करण्याच्या हेतुने लिखाण केले गेले. ही उपयुक्ततावादी विचारसरणी आहे.

कार्ल माक्सच्या विचाराने प्रभावित होवून मार्क्सवादी लेखनही मार्क्सवाद्यांनी सुरु केले. रशियामध्ये मार्क्सच्या विचारांवर आधारीत क्रांती झाली त्या विचारावर लेनीन, ट्रॉटस्की यांनी लेखन केले, जगामध्ये या विचाराचा प्रसार झ ाला. १९५० मध्ये भारतात श्रीपाद अमृत डांगे यांनी लेखन केले. उपलब्ध साधन सामग्रीचे मार्क्सवादाच्या आधारे पुर्नकुल्यांकनाचा मार्ग ही अवलंबीला या क्षेत्रात अनेक इतिहासकारांनी लेखन केले आहे. डांगे, डी.डी. कोसंबी, रजनी पामदल, रोमीला थापर, डॉ. नुरुल हसन, मोहम्मद हबीब, इरफान हबीब, अशा अनेक संशोधकांनी इतिहास लेखन करतांना नव मार्क्सवादी दृष्टिकोन स्विकारला. कारण सर्व घटकांच्या मुळाशी आर्थीक / भौतीक परिस्थिती असते, या व्यतीरिक्त संकृती, कला, विचार हे देखील असतात. याला इमला सिध्दांत असे म्हटले जाते. ५,६ यांचा आधार घेवुन मार्क्सवादी इतिहासकारांनी लेखन केले व मार्क्सच्या विचारांचा प्रसार करण्याचे व समाजवादी विचाराला पाठबळ

देण्याचा प्रयत्न उपयुक्ततावादी दृष्टीकोनातून करण्यात आला. याचा अर्थ माक्सवादी इतिहासकारामध्येही उपयुक्ततावादी विचार सरणी आहे.

अन्तोनिया ग्रामचीच्या लेखनातुन सबाल्टर्नवादी इतिहास लेखन सुरु झाले. भारतात १९८२ पासुन त्यांची सुरुवात झाली. व्यक्तीला केंद्रस्थानी मानुन इतिहास लेखन केले जावू लागले. इतिहासात सामान्य व्यक्तीही महत्वपुर्ण कार्य करतात पण त्यांची दखल घेतली जात नाही. सामान्य व्यक्तीलाही इतिहासात महत्व प्राप्त करुन देण्यासाठी विविध जाती, वर्ग, वंचीत समुदाय यांचे लखन सुरु झाले. ७ लोकशाहीमध्ये व्यक्तीला महत्व असते. अशा वंचीत घटकाला प्रेरणा देण्याच्या दृष्टीकोनातून इतिहासाचा उपयोग केला जावू लागला.

प्राचीन भारतीय वैदीक वाङमय निर्मीतीमागे सांस्कृतीक व मानसीक वर्चस्व लादण्याची वृत्ती दिसते. वेदातील पुरुष सुक्तात वर्ण सिध्दांत, आपस्तव धर्म सुत्र, मनुस्मृती, कथासंग्रहातील, शतपथ ब्राम्हण, वशिष्ट धर्म सुत्र, विष्णू स्मृती, गौतम धर्मसूत्र, बृहस्पती धर्मसुत्र अशा अनेक वैदीक वाङमयातून भारतातील शुद्र वर्गाला कमी लेखले गेले. त्यांची मानसीकता बदलण्यात आली व त्यांच्यावर वर्चस्व निर्माण केले गेले. ८ यामध्ये ही वरीष्ठ वर्गाने आपले प्रभूत्व निर्माण करण्यासाठी उपयुक्ततावादी दृष्टीकोन आपल्याला उपयुक्त होईल असे लेखन केले गेले.

थोडक्यात इतिहासलेखनामागे उपयुक्ततावादी विचारसरणी आहे. परंतु जेरेमी बेंथमचा उपयुक्ततावादी सिध्दांत तंतोतंतपणे पाळला गेला नाही. तर केवळ लेखन कर्त्यांने स्वहित नजरेसमोर ठेवून लेखन केले.

**निष्कर्ष :-**

१. सर्व प्रकारच्या लेखनामागे उपयुक्ततेचा दृष्टिकोन असतो.
२. उपयुक्ततेशिवाय इतिहास लेखन होत नसते.
३. विविध इतिहास लेखन प्रवाहाच्या मुळाशी उपयुक्ततावादाची विचार सरणी आहे.

**संदर्भ :**

१. शांता कोठेकर - इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन नागपुर, पृष्ठ क्र. १९३-१९५
२. शांता कोठेकर - कित्ता, पृष्ठ क्र. १९९-२०७
३. प्रा.व्हि.के.जाधव - आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र. ३६-३७
४. आर.पी. भांबरे, चव्हाण, मोरे - इतिहासाची ओळख, ब्रेनटॉनिक प्रकाशन नाशिक. पृष्ठ क्र. १११-११३
५. शांता कोठेकर - इतिहास : तंत्र, उपरोक्त, पृष्ठ क्र. २२७, २३४-२३५
६. इतिहास लेखनाच्या परंपरा - बा.सी. मर्ढेकर, मंगेश प्रकाशन नागपुर, पृष्ठ क्र. १२०
७. शांता कोठेकर - इतिहास : तंत्र, उपरोक्त पृष्ठ क्र. २४२-२४४.
८. शुद्रों कि खोज हिंदी अनुवाद भिमराव रामजी आंबेडकर, प्रबुध्द पुस्तकालय, नागपुर, पृष्ठ क्र. २४-२९